REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# भारतीय समाजामध्ये-मांग जातीचे स्थान : एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. डॉ. पडोळे डी. व्ही.**
**समाजशास्त्र विभाग प्रमुख , बी.एस.एस.कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, माकणी, ता.लोहारा**
**जि.उस्मानाबाद (महाराष्ट्र)**

## ❖ प्रस्ताविक :-

भारतात पूर्वीच्या काळी अस्तित्वात असलेल्या वर्णव्यवस्थेत शुद्रांना सर्वात खालचे स्थान होते. जाती व्यवस्थेत त्यांना **अवर्ण** म्हटले जात असे. ( भारतीय समाज ब्राम्हण,क्षेत्रीय, वैश्य व शुद्र अशा चार वर्णात विभागला) आहे. पूर्वीपासूनच शुंद्राची स्थिती अतिशय दयनीय स्वरूपाची असलेली दिसून येते. त्यांना गुलामासारखे वागवले जात होते. त्यांचा स्पर्श दूषित करते असे मानले जात असे. त्यामुळे त्यांना अस्पृश्य असे संबोधण्यात आले. अस्पृश्याची समस्या ही बाब भारतीय समाजात लागलेला कलंकच होता. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

महात्मा गांधीनी इ.स.१९३३ मध्ये अस्पृश्यांसाठी 'हरीजन' हा शब्द वापरला होता. परंतु अस्पृश्यातील नेत्यांना तो मानहानिकार वाटु लागला उलट त्यांनी स्वतःसाठी 'दलित' हा शब्द वापरू लागले म्हणजे हा दडपलेले शब्द म्हणजे त्यांची समाजातील स्थिती दर्शक शब्द जास्त पसंत करू लागले. **'सायमन कमिशनने'** या लोकांना **शेडयुल्ड कास्ट** असे संबोधले जात होते. १९९५ मध्ये भारतीय कायद्यानुसार सरकाराने आमलात आणेलेल्या कायद्यात या जातींना प्रथम औपचारिकरित्या शेडयुल्ड कास्ट (अनुसूचीत जाती) असे संबोधले.

मागासवर्गीय जातींना पुरातन काळापासून कमी लेखले जात असे. त्यांना वागणूकही तुच्छ दिली जात असे. आजही बहुतांश भागात कमी अधिक प्रमाणात त्यांना तशीच वागणूक दिली जाते. भारतीय लोकसंख्येत अनसूचित जातीची संख्या १६ ते १७ % इतकी आहे. अनुसूचित जातीमध्ये महार, मांग, चांभार, भंगी, ढोर अशा ५९ कनिष्ठ जाती समावेश होतो. पूर्वी हिंदू वावरत असलेल्या शाळा, स्वच्छतागृह, विहिरी व इतर सार्वजनिक ठिकाणी त्यांना प्रवेशास मज्जाव केला जात असे व विशिष्ट अंतर ठेवुन व्हावे लागत असे मागासवर्गीय जातीतील व्यक्तीशी इतर जातीतील लोक विवाह करत नसत. परकोटीची अमार्मिक असमानता जाती व्यवस्थेअंतर्गत होत्या. महाराष्ट्रात आजही ग्रामीण भागात व शहरी भागातही या व्यवस्थेचा प्रभाव जाणवतो.

## ❖ अभ्यासाचे महत्त्वः-

प्रस्तुत अभ्यासाचा मुख्य उद्देश भारतीय समाजातील दलित समाजाला सर्व प्रकीयामध्ये सामावून घेऊन त्यांचा इतर जातीप्रमाणे विकास करायचा आहे. त्यामुळे त्याची नेमकी सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कतिक स्थिती व विकासाच्या दिशा अभ्यास करणे गरजेचे आहे. विकासाच्या वेगवेगळया स्तरावर दलित जाती या तुलनेत मागासलेली व अनेक सोयी सवलतीपासून वंचित राहिलेली आहे. त्यामुळे संपुर्ण दलित जातीचे एकंदर स्थिती व स्थान काय आहे हे पाहणे महत्वाचे आहे समुहातील काही जाती प्रगत झाल्या आणि काही जाती अप्रगत राहिल्या आहेत. म्हणुन अप्रगत व वंचित समूहाकडे अथवा जातीकडे प्रगंत समूहातील विकासाची मुल्ये प्रस्थापित होऊन दोन्ही समूहात समानता येइल का यासंदर्भात शोध हेच या अभ्यासाचे महत्व आहे.



## ❖ अभ्यासाची उद्दिष्टयेः-

१. दलित समाजातील मांग जातीच्या स्थितीचा अभ्यास करणे.
२.दलित समाजातील मांग जाती अनुसूचित जातीत आहेत पण काही दलीत जातीसमूहाच्या तुलनेत विकासाच्या विविध क्षेत्रात मागे आहे त्यांच्या या मागासलेपणाची कारणे शोधणे.
३.दलित उन्नतीच्या व उद्धाराच्या हेतूने प्रेरित असलेल्या दलित चळवळीत मांग जातीचा सहभाग असण्याच्या दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.

४. धर्म व धर्मातंर याबाबत मांग समाजातील व्यप्तीची नेमकी भूमिका कोणती आहे हे तपासणे.
५. शासनाने दिलेल्या विविध सोयी व सवलती या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या आहेत. पण या लाभापासून काही दलीत अतिशय मागे आहेत. म्हणुन ती मागासलेली व उपक्षीत राहिली आहेत. त्याच्या फायदयासाठी त्यांच्या उन्नतीसाठी व प्रगतीसाठी स्वतंत्र आरक्षणाची मागणी जोर धरत आहे. या पार्श्वभुमीवर याची परिस्थिती व असलेली गरज आणि या जातीतील अनुभूती समावून घेणे.

### ❖ गृहीतके:-

१. दलित समाजातील मांग जातीची स्थिती ही अविकसीत दिसते.
२. इतर जाती अनुसूचित जातीतील इतर समूहाच्या तुलनेत मांग जातीच्या विकासातील विविध स्तरावर मागे आहे.
३. राजकीय आणि संघटनात्मक दृष्टीने हा समाज आणखीन अज्ञानी अज्ञान आहे. सामाजिक नेतृत्वाचा स्विकार केला जात नाही.
४. धार्मिक दृष्टीने या समाजात मानसिक, कौटुंबिकआर्थिक अडचणी निर्माण झालेल्या आहेत.
५. आत्याचाराच्या प्रतिकाराचे स्वरुप सौम्य नाही .
६. **अण्णाभाऊ साठे** महामंडळाचे सुधारणेस तिचे अपयश, स्वतंत्र आरक्षणाबाबतची गरज तपासणे.

### ❖ संधोधन पध्दती:-

भारतीय समाजव्यवस्थेत दलीत समाजात मांग जातील समाविष्ट करण्याचा हेतु विषयक दलित व अल्पसंख्याक समाजास सामाविष्ठ करून घेण्याचा व दृष्टीकोन अभ्यासणे सदरील शोध निंबध तयार करताना दुय्यम स्त्रोचा वापर केला. दुय्यम स्त्रोतात विविध संदर्भ साहित्य, प्रकाशित, अप्रकाशित विविध शासकीय अहवाल, नियतकालिके इ. समावेश आहे.

### ❖ स्थान:-

भारतामध्ये बहुसंख्याकांचा धर्म हा हिंदु आहे. हिंदु धर्माचे महत्त्वाचे वैशिष्टये म्हणजे वर्णव्यवस्था आणि याच्या अनुषंगाने निर्माण झ ाालेली जाती संख्या होय. भारतीय समाजव्यवस्था ही इतर देशाच्या समाजव्यवस्थेच्या तुलनेत पारंपारिक आणि गतिमानावर वाव न देणारी म्हणुन विकासाच्या गतीमध्ये मागे राहिली दलीता मधील काही जाती ही मुळत महाराष्ट्रातील आहे. कारण मांग मातंग किंवा नावाचे लोक महाराष्ट्र व मध्यप्रदेशच्या व्यतिरिक्त देशातील इतर कोणत्याही राज्यात पहावयास मिळत नाहीत.

मांग जातीचा प्रथम उल्लेख **१२ व्या** शतकात **श्री. बसवेश्वरांच्या अनुभावमंडपात** वेगवेगळया जातीचे संत जमले होते. त्यात **मांगचन्नया** सुध्दा होता अशा प्रमाणाचा आशय येतो. पुढे मांग जातीचा जात म्हणुन उल्लेख लीळाचरित्रात आढळतो हा ग्रंथ **१३ शतकाच्या** उत्तरार्धात लिहलेला असुन तो **ज्ञानेश्वरी** पुर्व आहे.

महाराष्ट्रात या जातीला **मांग** म्हणुन म्हैसुन प्रदेशात याचा निर्देश **मदिरा** असा करतात. गुजरात मध्ये **मांगेला** म्हणुन संबोधतात मध्यप्रदेशात मांग असाच उल्लेख आढळुन येतो.

मातंगानी किंवा मांगानी प्राचीन काळी राज्य स्थापन केल्याचे उल्लेख ऐतिहासिक कालखंडात आहेत. कोसल देशाचा राजा **प्रसेनजित** मातंगाच्या जातीतुन उदयास आला. कर्नाटकात मांग वंशाचे राज्य होते.

थोडक्यात प्राचीन समाजव्यवस्थेत मातंगानी राज्ये स्थापना केलेला ऐतिहासिक पुरावे दिसुन येतात. इतरांची राज्ये धुळीस मिळवली होती. **राजवैभवाचे** सुख दोहळे भंगले. त्यांनतर ब्राम्हणी वर्चस्वामुळे गुलामगिरीच्या खोतेऱ्यात उभे आयुष्य घालवलेही.

महाराष्ट्रात **मांगाच्या २४** पोट जाती आहेत. **लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या** माहिती प्रकाशनात मांग जातीचा पुढील उपजाती स्पष्ट केल्या आहे.

मांग, मातंग, मिनी, मदिंग, दानखणी, मांग, मांग महाशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गारोकी,

दलितामधील मांग जातीच्या सुधारणेविषयी आलेले प्रयत्न पाहता स्वातंत्र्यपुर्वक कालखंडामध्ये देखील दलितातील मांग जातीना हिनतेची वागणुक मिळाली होती. ब्रिटीश कालखंडात काही प्रमाणात दलित जातीतील लोकांना शिक्षणाचा हक्क मिळाला.परंतु महार-मांग या दलित जातीत हळुहळु त्यांच्यात बदल करुन घेवू लागले होते.

**महात्मा फुलेनी १८५२ मध्ये पुणे** येथे **नवी पेठ** आणि **भोकावाडीत** केवळ मांग-महारासाठी शाळा सुरू केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजात बदल घडुन यावा यासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न केले. भारतीय संविधानामध्ये अस्पृश्यांना कायदेशीररित्या स्वांतत्र्य मिळवुन दिले त्यातुन अस्पृश्यता निर्मुलन व सुधारणा घडवुन आणण्यासाठी प्रयत्न केले.

अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतुन महाराष्ट्र जागवला **फकिरा** सारख्या कांदबरीतुन अन्यायविरुध्द आत्याचाराविरुध्द स्वाभिमानाने लढा कसा दिला जाऊ शकतो हे सांगितले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदु धर्म व्यवस्थेत काही सुधारणा सुचवल्या होत्या. पण त्या हिंदु व्यवस्थेकडुन नाकारल्या गेल्या. परिणामी **डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १३ ऑक्टोबर १३९५** रोजी नाशिक जवळील जवळील येवला येथे परिषद बोलावुन धर्मातराची

घोषणा केली व **१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपुर** येथे आपल्या असंख्य अनुयायसह धर्मातर करुन बौध्द धर्माची दिक्षा घेतली. धर्मातराच्या या चळवळीत मांग समाजावरही परिणाम झाला. **दि. ०२/०६/१९३६** रोजी **मांतग परिषद** घेण्यात आली. या परिषदेला **डॉ.बाबासाहेब आंबेडकर** हजर होते. या प्रसंगी मांग परिषदेकडुन धर्मातराचा ठराव पास केला गेला होता परंतु महार समजाने पुढे ज्या प्रमाणात ज्या संख्येने धर्मातर केले तेवढे धर्मातर मांग जातीने केले नाही.

महाराष्ट्र शासनाने समाजातील दारिद्रय रेषेखालील जीवनमान जगणाऱ्या दुर्बल अनुसुचित जातीतील मांतग समाज व त्यांअतर्गत असलेले **१० पोट जातीच्या** आर्थिक व सामाजिक विकास करण्याच्या दृष्टीने **दि.११जुलै १९८५** रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ स्थापन करुन मागासवर्गात मोडणाऱ्या मांतग समाजाच्या सर्वागीण प्रगतीसाठी पाऊल उचलेले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्ययाच्या उन्नतीसाठी राज्यघटनेत ज्या विविध तरतुदीच्या केल्या त्यामुळे अस्पृश्याच्या हक्कांना घटनात्मक वैधता प्राप्त झाली. आज शासन समाजकल्याण योजनेच्या विविध योजना राबवते. डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या प्रयत्नामुळे अस्पृश्यांना शिक्षणसंस्था, कायदेमंडळ, पंचायत राज्यव्यवस्था सरकारी नोकऱ्या इत्यादी मध्ये आरक्षण मिळाले. या आरक्षणामुळे अस्पृश्यांना अधिकार, मालमत्ता व उच्च सामाजिक दर्जा मिळने शक्य झाले.

## ❖ निष्कर्ष :-

परिवर्तन हा प्रत्येक समाजव्यवस्थेचा स्थायी गुणधर्म आहे. भारतीय समाजव्यवस्थेची धर्म व जातीवर अधारित वैशिष्टये लक्षात घेता एकंदरीत भारतीय समाज परिवर्तनाचा इतिहास मंदगतीचा राहिला आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात मागासलेल्या जातीच्या उन्नतीसाठी काही जाणीवपुर्वक प्रयत्न झाले आहेत. त्याचा फायदा घेऊन आपले स्थान उंचविण्यासाठी ते यशस्वी ठरले नाहीत त्यामुळे ते अनेक क्षेत्रात मागे रहिले आहे. जसे शिक्षण, उत्पन्न, राहणीमान, इ.

महाराष्ट्रात अनुसुचित जाती समुहातील महारा आणि मांग हे संख्येने पहिल्या अणि दुसऱ्या क्रमांकावर आहेत. गेल्या पाच दशकांतील विकासप्रक्रियेचा आढावा घेतल्यास हे स्पष्ट होते की, विकासाच्या वेगवेगळया स्तरांवर मांग जात तुलनेत मागसलेली व अनेक सोयी-सवलतीपासून वंचित राहिलेली आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासुन ते आजपर्यत मांग जातीची झालेली प्रगत संपुर्ण दलित जातीतील स्थिती किंवा स्थान व एकाच समूहातील काही जाती प्रगत झाल्या आणि काही अप्रगत राहिल्या आहेत.हे आपणास सदरील शोध पत्रिकेत दिसुन येते.

## ❖ उपाय :-

या समुदायाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक शैक्षणिक इ.पातळयावर ची सुक्ष्म चिकित्सा व विश्लेषण करण्यात आलेले आहे. शिवाय या समुदायाच्या विकासात्मक बदलाच्या गतिमत्वाचा शोध घेण्यात आलेला आहे. या अनुषंगाने त्याच्या विकासासाठी प्रयत्न व उपाय करणे आवश्यक आहे. त्या बाबत ठळक उपाय पुढील प्रमाणे स्पष्ट करण्यात आले आहे.

१) अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने या समुदायाची शैक्षणिक जबाबदारी स्विकारुन त्यांच्यासाठी प्रत्येक तालुका, जिल्हा पातळीवर स्वतंत्र्य सोयीनीयुक्त वसतिगृहे तात्काळ सुरू करावीत.
२) या समुदायाच्या मूलभूत आर्थिक विकासासाठी लघुउद्योग सुरू करावे.
३) त्यांच्यासाठी शासनाने वेगळे आरक्षण दिले तर तो समाज समाजाच्या विकासाच्या प्रवाहात येईल.
४) त्याच्या जो प्राचीन काळापासुन व्यवसाय आहे त्या व्यवसायासाठी कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करु देणे
५) उच्च शिक्षणाधिकारी परदेशासाठी विशेष शिष्यवृत्ती देणे

## ❖ संदर्भ ग्रंथ :-


१) हिंदु काडे बिल आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर
२) शिक्षण संक्रमण अंक
३) किरण बेदी मजल दरमजल
४) निलजर द.य. समग्र हिंदू कायदा, प्रसाद मुद्रण, नागपुर
५) लाजेवारी ज्योती, फुले आंबेडकर आणि स्त्री मुक्ती चळवळ, संकेत प्रकाशन औरंगाबाद
६) सामाजिक संशोधन पध्दती, प्रदीप आगलावे
७) महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास - व्ही.बी.पाटील
८) डॉ.बाबासाहेब आंबेडकर - धनंजय किर



**प्रा. डॉ. पडोळे डी. व्ही.**
समाजशास्त्र विभाग प्रमुख , बी.एस.एस.कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, माकणी, ता.लोहारा जि.उस्मानाबाद (महाराष्ट्र)